## प्रकरण ५ वें

# विवेचन

गोळे–कुलासंबंधाचे ऐतिहासिक कागदपत्र, त्यांच्या वंशावळी, त्यांचीं वसतिस्थानें व त्यांची माहिती यांचा संग्रह येथपर्यंतच्या प्रकरणांतून करण्यांत आला. आतां या सर्व वृत्तान्तावरून कुल, ज्ञाति व समाज यांसंबंधी ज्या सामान्य व व्यापक स्वरूपाच्या कल्पना सुचतात, त्यांचें दिग्दर्शन या प्रकरणांत करावयाचें आहे.

प्रस्तुत ग्रंथ ज्या पद्धतीनें तयार केला आहे, त्याच पद्धतीनें परांजपे व थत्ते यांचे कुलवृत्तान्त तयार झालेले असल्यामुळें, या कुलांतील माहिती गोळे कुलाच्या माहितीशीं ताडून पाहणें सोपें आहे. परांजपे कुलांतील विद्यमान पुरुषव्यक्तींची संख्या १५९२ व थत्ते कुलांतील ५९३ आहे. आणि गोळे कुलांतील ही संख्या फक्त १९७ भरते. म्हणजे गोळे-कुल हें कोंकणस्थांतील अल्पसंख्य कुलांपैकीं आहे असें ठरतें. गोखले, केळकर, बापट, आपटे, परांजपे, भिडे, गोडबोले, साठे, रानडे, लिमये, जोगळेकर, मराठे, करंदीकर, फडके, इत्यादि कुलें बहुसंख्य आहेत. म्हणजे गोळ्यांच्या मानानें कितीतरी पटीनें अधिक आहेत. असें असून देखील **कोंकणस्थांची** एकंदर संख्या **एक लक्ष चाळीस हजार** व त्यांच्यांतील आडनांवांची संख्या सुमारें **साडेतीनशें** आहे. ही गोष्ट लक्षांत घेतली असतां प्रत्येक आडनांवाची एकंदर लोकसंख्या सरासरी मानानें **चारशें** भरते. त्यांपैकीं स्त्रियांची व पुरुषांची संख्या सारखी धरल्यास, प्रत्येक कुलांतील पुरुष-संख्या सुमारें **दोनशें** म्हणजे गोळेकुलांतील पुरुषसंख्येइतकी येते. यावरून हें सरासरी मान येण्यास पुष्कळच कुलांतील पुरुषसंख्या **दोनशेंपेक्षां कमी** असली पाहिजे, हें सहज समजण्याजोगें आहे. उदाहरणार्थ, आचवल कुलाची गणना एक वर्षापूर्वीं करण्यांत आली.

त्यावरून त्या कुलांतील एकंदर विद्यमान पुरुषव्यक्तींची संख्या फक्त **एकूणसाठ** भरली. गोळेकुल हें वर सांगितल्याप्रमाणें अत्यल्पसंख्य किंवा अतिबहुसंख्य आडनांवांपैकीं नाहीं. म्हणजे मध्यम मानाची संख्या असलेल्या कुलांपैकीं आहे. गोळे कुलांतील व्यक्तींचे धंदे समजले म्हणजे त्यांच्या स्थितीची कल्पना येऊन इतर कुलांशीं तुलना करतां येईल. पुढें १७८—१७९ या पृष्ठांवर गोळे कुलाची प्रांतवारी व धंदेवारी दाखविणारें कोष्टक दिलें आहे. त्यामध्यें (१) नोकर (२) स्वतंत्र धंदा करणारे आणि (३) लहान मुलें व विद्यार्थी असे तीन भाग मुख्य असून व्यवसायसूचक आणखी विभाग दाखविले आहेत.

**एकंदर कोंकणस्थ, थत्ते आणि गोळे यांची प्रांतवारी व शेकडेवारी**

| प्रांत | कोंकणस्थांची संख्या-हजार | कोंकणस्थ शेकडेवारी | थत्ते शेकडेवारी | गोळे शेकडेवारी |
|---|---|---|---|---|
| रत्नागिरी | २८ | २० | १९·७ | ५·५ |
| पुणें | २१॥ | १५·१ | ११·५ | ३० |
| दक्षिणी संस्थानें | १८ | १३ | २ | ० |
| कुलाबा | १३॥ | ९·७ | २·२ | ·५ |
| वऱ्हाड—मध्यप्रांत | १२ | ८·५ | ९·५ | १६ |
| ठाणें | ९ | ६·४ | ३·३ | ९·५ |
| मुंबई बेट | ६॥ | ४·६ | ९·७ | १० |
| सातारा | ६ | ४·३ | ३ | ३ |
| नाशिक | ४ | २·९ | ८·५ | ४·५ |
| खानदेश | ४ | २·९ | ४ | २ |
| सोलापूर | ३। | २·३ | ३·५ (सोलापूर व नगर मिळून) | ० (सोलापूर व नगर मिळून) |
| नगर | १॥ | १·१ | | |
| इंदूर, बडोदें, हैद्राबाद इ. | १३ | ९·२ | २३·१ | १९ |
| | १४० | १०० | १०० | १०० |

## गोळे कुलाची

| धंदे | रत्नागिरी | कुलाबा | ठाणें | पुणें | सातारा | सोलापूर नगर |
|---|---|---|---|---|---|---|
| १८ सरकारी नोकर | ० | ० | २ | २ | ० | ० |
| ४ निमसरकारी नोकर | ० | ० | ० | ० | ० | ० |
| १० पेन्शनर | २ | ० | ० | २ | १ | ० |
| ५ शिक्षक | ० | ० | २ | ० | १ | ० |
| १ रेल्वे नोकर | ० | ० | ० | ० | ० | ० |
| ७ खाजगी नोकर | ० | ० | ३ | ० | ० | ० |
| ४५ नोकर | २ | ० | ७ | ४ | २ | ० |
| ११ डॉक्टर, वकील | १ | ० | ० | ३ | ० | ० |
| १२ इतर स्वतंत्र धंदेवाले | ० | १ | ३ | ५ | ० | ० |
| ४ व्यापारी | ० | ० | १ | २ | ० | ० |
| २१ {शेतकरी, खोत इनामदार, सुखवस्तु} | २ | ० | २ | ११ | ० | ० |
| भिक्षुक | ० | ० | ० | ० | ० | ० |
| ४८ विननोकर | ३ | १ | ६ | २१ | ० | ० |
| २४ लहान मुलें | १ | ० | ३ | ६ | ० | ० |
| २९ प्राथमिक विद्यार्थी | २ | ० | २ | १३ | ० | ० |
| ४४ हायस्कूल विद्यार्थी | ३ | ० | १ | १३ | ४ | ० |
| ७ कॉलेज विद्यार्थी | ० | ० | ० | ३ | ० | ० |
| १०४ मुलें व विद्यार्थी | ६ | ० | ६ | ३५ | ४ | ० |
| १९७ एकूण | ११ | १ | १९ | ६० | ६ | ० |

प्रांतवारी, धंदेवारी

| नाशिक | खानदेश | दक्षिणी संस्थानें | मुंबई बेट | वऱ्हाड मध्यप्रांत | इंदूर स्टेट | निजामचें राज्य | बडोदें, मद्रास, यु.पी.इ. |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | ० | ० | २ | ३ | २ | १ | ५ |
| ० | १ | ० | १ | २ | ० | ० | ० |
| ० | १ | ० | ० | १ | २ | ० | १ |
| ० | ० | ० | ० | ० | ० | ० | २ |
| ० | ० | ० | १ | ० | ० | ० | ० |
| ० | १ | ० | २ | ० | ० | ० | १ |
| १ | ३ | ० | ६ | ६ | ४ | १ | ९ |
| १ | ० | ० | २ | ३ | ० | १ | ० |
| १ | ० | ० | १ | १ | ० | ० | ० |
| ० | ० | ० | ० | ० | ० | ० | १ |
| ३ | ० | ० | ० | २ | ० | ० | १ |
| ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| ५ | ० | ० | ३ | ६ | ० | १ | २ |
| ० | १ | ० | ४ | ६ | १ | ० | २ |
| २ | ० | ० | १ | ५ | २ | १ | १ |
| १ | ० | ० | ३ | ७ | ६ | १ | ५ |
| ० | ० | ० | २ | १ | ० | ० | १ |
| ३ | १ | ० | १० | १९ | ९ | २ | ९ |
| ९ | ४ | ० | १९ | ३१ | १३ | ४ | २० |

पृष्ठ १७७ वर दिलेल्या कोष्टकावरून असें दिसून येतें कीं, दक्षिणी संस्थानांत गोळ्यांची वस्ती मुळींच नाहीं; कोंकणांत त्यांच्या वस्तीचें प्रमाण फार थोडें असून पुणें जिल्ह्यांत त्यांची वस्ती अधिक प्रमाणांत आहे. ही त्यांची आजची स्थिति त्यांच्या ऐतिहासिक परिस्थितीची निदर्शक आहे. अडीचशें वर्षांपूर्वी या कुलांतील लोक चिपळूण तालुक्यांत वेळंदूर—गुहागराकडे महाजन व खोत या नात्यानें वागत होते व त्यांची सांपत्तिक स्थिति बरी होती, यामुळें पेशवाईच्या प्रारंभीं चासकर जोशी यांच्या सारख्या सावकारी घराण्यांचे ते सोयरे होऊं शकले. पेशवे हे गार्ग्यगोत्री, आणि गोळे हे भारद्वाजगोत्री; अर्थात् ते समवर असल्यामुळें त्यांच्यांत मुळींची देवघेव होणें शक्य नव्हतें. परंतु वर सांगितल्याप्रमाणें चासकरांमार्फत गोळे हे बाळाजी बाजीराव ऊर्फ नानासाहेब पेशव्यांचे मावस बंधु लागत होते. यामुळें त्यांचा प्रवेश पुणें दरबारांत सहज होऊं शकला. पुढें नानासाहेबांच्या नंतर विकोपास गेलेल्या पेशवाईंतील भाऊबंदीच्या तंट्यांत गोळ्यांनीं माधवराव आणि नाना फडणीस यांचा पक्ष धरल्यामुळें त्यांच्यावर कैद होण्याचा अगर जबर दंड देण्याचा प्रसंग केव्हांच ओढवला नाहीं. त्याचप्रमाणें पटवर्धन, रास्ते वगैरे सरंजामी सरदारांप्रमाणें मोठ्या फौजा बाळगून रणांगणावर जाण्याचेंही काम यांनीं पतकरलें नव्हतें; यामुळें अनेक पुरुषांना जिवास मुकण्याचे प्रसंग ज्यांत येतात अशा प्रकारचा धक्काही या घराण्याला लागला नाहीं. नानासाहेबांच्या कारकीर्दींत ताराबाईच्या दिमतीस गोळे यांना देण्यांत आलें होतें व ताराबाई आणि पेशवे या दोघांचीही मर्जी संभाळून राहण्याचें काम त्यांनीं बऱ्या रीतीनें केल्यामुळें ताराबाईनें त्यांना मरढें वगैरे गांवें इनाम दिलीं. यामुळें इनाम गांवांचें उत्पन्न खाऊन अधूनमधून एखाद्या परगण्याची मामलत करण्यापर्यंत यांनीं पेशवाईंतील राजकीय उलाढालींत

भाग घेतला. पेशवाईंत कोंकणांतून येणाऱ्या कोंकणस्थांना पुणें दरबारांतील फडांत कारकुनीची जागा मिळूं शकत होती, तशी गोळ्यांनाही मिळाली होती. परंतु याखेरीज पटवर्धन इत्यादि सरदारांच्या आश्रयास जाण्याची जी अवश्यकता इतर बहुसंख्य कोंकणस्थ कुलांना भासली, ती गोळ्यांना भासलेली दिसत नाहीं. त्यांची संख्या थोडी असल्यामुळें व त्यांचें नातें पेशव्यांपर्यंत पोचत असल्यामुळें त्यांना पुणें दरबारचा आश्रय चरितार्थ चालविण्याच्या दृष्टीनें पुरेसा होता. नोकरीसाठीं दक्षिणी संस्थानांत गोळे गेले नाहींत, याचें कारण हेंच असावें असें वाटतें. तथापि पटवर्धन सरदारांना व गोविंदराव गायकवाडांस त्यांनीं वेळोवेळीं कर्जाऊ रकमा दिल्या होत्या, आणि मिरजेकडे व अहमदाबादेकडे त्यांच्या पेढ्याही होत्या. दुसऱ्या रावबाजीच्या कारकीर्दींत यांचें उत्पन्न चार पांच वर्षें जप्त करण्यांत आलें होतें; पण गोळ्यांनीं मोठ्या राजकीय उलाढालींत प्रामुख्यानें भाग घेतला नव्हता; यामुळें बाजीरावाची अवकृपा देखील फार दिवस टिकली नाहीं; आणि त्यांच्या इनामाची जप्ती उठली. अशा प्रकारें पेशवाई संपून इंग्रजी अमदानी सुरू झाली, तेव्हां मर्ढेकर गोळे घराणें आपल्या इनामगांवच्या उत्पन्नावर चरितार्थ चालवून सुखवस्तु म्हणून नांदत होतें.

मर्ढेकरांखेरीज राहु-पिंपळगांव व परिंचें येथील गोळ्यांच्या शाखा पेशवाईंत अनुक्रमें पागेवर व सुभेदारीवर काम करीत होत्या. त्यांनाही इनाम जमिनी असल्यामुळें पेशवाई संपली तेव्हां, त्या जमिनींचा आधार मिळूं शकला. मात्र परिंचेकर शाखेपैकीं चिंतो महादाजी यानें भविष्य बरोबर वर्तविल्यामुळें गोविंदराव गायकवाड यांनीं गुजराथेंत बलेसर परगण्यांतील ऐने गांव इ. स. १७९४ मध्यें इनाम दिला. याशिवाय

गोळ्यांच्या आणखी एका शाखेंतील पांडुरंग रामचंद्र नांवाचा गृहस्थ, इंग्रजांचा दंगा वसई प्रांतांत झाला त्यावेळीं, जव्हार संस्थानच्या फार उपयोगीं पडला; याबद्दल पतंगशहानें त्यांना गंजाड परगण्यांतील मवाडें गांव इनाम दिला. नंतर जव्हारच्या राजास पेशव्यांची खंडणी भरण्यास अडचण पडली होती, तेव्हां पांडुरंग रामचंद्रानें एक लाख रुपये पुणें दरबाराकडे भरल्यामुळें त्याला त्या राजाकडून जातेगांव बुद्रुक व चिंचवडें हीं गांवें इनाम मिळालीं. अशा रीतीनें पेशवाई-अखेर यांची सुस्थिति असून त्यांचे वाडे नाशिकास होते. परंतु पेंढाऱ्यांची धाड तेथें आली, तेव्हां यांचे वाडे जळून उध्वस्त झाले; यामुळें ते जातेगांवास राहूं लागले. ही शाखा मढेंकर शाखेला वंशावळीच्या दृष्टीनें जवळची आहे, परंतु तिचा संबंध मढेंकरांच्या उत्पत्तीशीं येऊं शकला नाहीं.

देशावर आलेल्या शाखांची ही माहिती नमूद केली. यांखेरीज वेळंदूर येथें कायम राहिलेल्या शाखेंतील मंडळींना पेशवाईच्या किंचित् आधीं हबशाकडून खोतीची सनद मिळाली होती; व ते पेशवाई-अखेर तेथेंच खोती करून होते. शिवाय हलीं कुळगांवांत असलेल्या शाखेचे मूळपुरुष पिलाजी हरी हे इ. स. १६७४ मध्यें गुहागरास महाजन होते. यानंतर त्यांचे वंशज पुण्याकडे आले पण त्यांच्या संबंधीं अधिक माहिती मिळत नाहीं.

एकंदरींत राजारामाच्या मृत्यूनंतर पेशवाई संपेपर्यंत जो सुमारें सवाशें वर्षांचा काळ लोटला त्या अवधींत स्वराज्याचा आश्रय मिळून लोकसंख्येच्या वाढीस अनुकूल अशी जी परिस्थिति कोंकणस्थ ज्ञातीस मिळाली, तिला अनुसरून गोळेकुलाचीही वाढ झाली. त्यानंतर इंग्रजी अमदानींतल्या शें सवाशें वर्षांत त्यांना शिक्षणाच्या

चढाओढींत सामील व्हावें लागलें. यामुळें आंग्लविद्या–शिक्षितांनीं स्वीकारलेले डॉक्टर, वकील, मास्तर, सरकारी नोकर वगैरेंचे जे धंदे इतर उपनांवाच्या लोकांमध्यें आढळतात, ते गोळ्यांनींही स्वीकारलेले दिसतात. यासंबंधाचा तपशीलवार तक्ता खालीं दिला आहे. कांहीं व्यक्तींचे अनेक व्यवसाय असतात; त्यांपैकीं येथें एकच मुख्य व्यवसाय वर्गीकरणाच्या सोईसाठीं धरला आहे.

## व्यवसायसूची

| | | | |
|---|---|---|---|
| सरकारी नोकर | १८ | इतर स्वतंत्र धंदेवाले | १२ |
| निमसरकारी | | ६ एजंट | |
| ( म्युनिसिपल नोकर ) | ४ | १ गवई | |
| पेन्शनर | १० | ४ टेलर | |
| इंग्रजी शिक्षक | ४ | १ संशोधक | |
| मराठी शिक्षक | १ | शेतकरी, खोत | ७ |
| रेल्वे नोकर | १ | इनामदार, सुखवस्तु | १४ |
| खाजगी नोकर | ७ | लहान मुलें | २४ |
| डॉक्टर | ४ | प्राथमिक विद्यार्थी | २९ |
| वकील | ७ | हायस्कूल विद्यार्थी | ४४ |
| व्यापारी | ४ | कॉलेज विद्यार्थी | ७ |
| | ६० | | १३७ |

एकूण ६० + १३७ = १९७

यावरून गोळे कुलांतील लोकांपैकीं कोणीही भिक्षुक नाहींत, हें लक्षांत घेण्याजोगें आहे. त्र्यंबकेश्वरच्या जुन्या नामावळ्या पाहिल्या

तरी त्यांत देखील कोणत्याही नांवापुढें 'भट' हा शब्द आढळत नाहीं. यावरून हें घराणें गेल्या तीनशें वर्षांत गृहस्थी पेशानें राहत आहे असें दिसतें. त्याचप्रमाणें पेशवाई अखेर आपआपल्या इनाम गांवीं कांहीं गोळे मंडळी राहत असत. परंतु आज मर्ढेकरांच्या व ऐनेकरांच्या वंशजांपैकीं कोणीही इनाम गांवांत राहत नाहींत. पुणें, सातारा, नाशिक, नागपूर, इंदूर इत्यादि शहरांत ते रहिवासी झाले आहेत. खोतांपैकीं, परिंचेकरांपैकीं कांहीं व्यक्ति मात्र आपल्या गांवीं कायम आहेत. इंग्रजी शिक्षणाच्या शहरांतील सोयी व तें शिक्षण संपादन करण्याची कोंकणस्थांची हौस यांनीं गोळ्यांना गेल्या पन्नास पाऊणशें वर्षांत नगरवासी बनविलें, आणि वऱ्हाड, नागपूर इत्यादि भागांत राहण्यास लाविलें. तथापि परांजपे व थत्ते यांच्या मानानें पाहतां अद्यापि या कुलाला शेतीच्याच आश्रयावर सुखवस्तु अशी स्थिति लाभली आहे, हें पुढील शेकडेवारीच्या कोष्टकावरून दिसतें.

| | गोळे | परांजपे | थत्ते |
|---|---|---|---|
| नोकरी | ४९ | ५४ | ५५ |
| स्वतंत्रधंदे | २९ | ३५ | २३ |
| शेती | २२ | ५ | १४ |
| भिक्षुकी | ० | ६ | ८ |
| | १०० | १०० | १०० |

गोळे कुलाची सांपत्तिक स्थिति इतरांच्या मानानें चांगली आहे, याचें प्रत्यंतर त्यांच्यामधील पदवीधरांच्या संख्येंत सांपडण्याजोगें आहे. उदाहरणार्थ, थत्ते कुलांतील विद्यमान पुरुषव्यक्ति सुमारें ६०० असून

त्यांत पदवीधरांची संख्या ३० आहे. म्हणजे त्यांच्यांत पदवीधरांचें शेंकडा प्रमाण ५ आहे आणि गोळ्यांची संख्या २०० असून त्यांत पदवीधर २० आहेत म्हणजे शेंकडा प्रमाण १० आहे. पदवीधर होण्याला जी सांपत्तिक स्थिति लागते ती थत्त्यांच्या पेक्षां गोळ्यांना दुप्पट अनुकूल आहे, असा याचा अर्थ आहे. मॅट्रिकपर्यंत बहुतेक कुलां-तील कोंकणस्थ विद्यार्थ्यांचें प्रमाण सारखें असतें. पण कॉलेजांतील अभ्यासक्रम झेंपण्यास बुद्धीच्या इतकेंच पैशाचेंही पाठबळ असावें लागतें. "ब्राह्मणजातीय नव्या तरुण पिढीचा शारीरिक व मानसिक ऱ्हास झाला व होत आहे. या ऱ्हासाचें मोठें कारण, म्हणजे शाळांतील सांप्रतची शिक्षणपद्धति होय; शिक्षणानें शरीराचें व मेंदूचें जें नुकसान होतें, तें पुढें कोणत्याही उपायानें भरून येत नाहीं." असें प्रति-पादन बेचाळीस वर्षांपूर्वी कै. महादेव शिवराम गोळे यांनीं आपल्या, 'ब्राह्मण आणि त्यांची विद्या' या ग्रंथांत केलें होतें; ( आवृत्ति १ ली, पृ. ९८ ) आणि मुलांच्या व्यायामाकडे विशेष लक्ष देण्या-विषयीं सुचविलेंही होतें.§ त्यांच्या या सूचनेकडे शाळांच्या चालकांचें लक्ष गेल्यामुळें विद्यार्थ्यांचा शारीरिक ऱ्हास न व्हावा म्हणून गेल्या दहा पंधरा वर्षांत बरीच खबरदारी घेण्यांत येते. व्यायामांत काठी-लाठीचे खेळ असावे, लष्करी पद्धतीचें शिक्षण देण्यांत यावें, वगैरे ज्या सूचना मि. माधवरावांनीं केल्या होत्या, त्या अलीकडे

§ 'हिंदुधर्म आणि सुधारणा' या त्यांच्या ग्रंथांत प्रचलित शिक्षण-पद्धतीचे दुष्परिणाम व नगरवासी यांचा ऱ्हास विस्तारानें सांगितला असून, जमिनींत ज्याप्रमाणें निरंतर एकच एक पीक काढीत बसलें तर ती निःसत्त्व होते, त्याप्रमाणें बुद्धीचाही धर्म आहे; यासाठीं बुद्धि पडीत ठेविली नाहीं, तर, तिचा ऱ्हास होतो, असें प्रतिपादन केलें आहे

अमलांत येत आहेत, एवढेंच नव्हे; तर शाळेंतील विद्यार्थ्यांची आरोग्यदृष्ट्या तपासणीही होत आहे. वजन व उंची यांचे आंकडे टिपून, आणि दांत व डोळे यांची तपासणी करून, पालकांना जागे करणें, इत्यादि गोष्टी शहरांतील शाळांचे चालक नियमितपणें करीत असतात. अर्थात् या तपासण्या अधिक बारकाईनें होऊन त्यांची अंमलबजावणी आईबापांकडून सध्यांपेक्षां अधिक चांगल्या रीतीनें झाली पाहिजे, हें खरें. परंतु शाळांचे चालक आणि पालक यांनीं या दिशेनें पाऊल टाकण्यास सुरवात केली आहे, त्या अर्थीं या बाबतींत इष्ट ती सुधारणा अधिकाधिक प्रमाणांत घडून येईल, असें समजण्यास हरकत नाहीं.

खुद्द शिक्षणाच्या बाबतींत सदर ग्रंथांत आणखी एक महत्त्वाची सूचना केलेली आहे, तिच्याकडे जावें तितकें लक्ष गेलेलें दिसत नाहीं. त्यांची सूचना अशी—"हल्लीं शाळांतून ज्यांस मिळतो त्यांस शेवटपर्यंत आश्रय मिळतो व जीं आश्रयास अधिक पात्र, ज्यांनीं पूर्वीं स्वावलंबन दाखविलें, पन्नासांतील दहा रुपये मुलांच्या विद्ये-करितां ज्यांनीं खर्च केले, त्यांचीं मुलें वरिष्ठ विद्येचा क्रम सोडून घरीं बसतात, ही स्थिति योग्य नाहीं. याकरितां औदार्याच्या वांटणीचे कांहीं नियम केले पाहिजेत. प्राथमिक शाळेंत अगदीं गरिबांस मात्र नादार घ्यावें; ज्यांनीं प्राथमिक शाळेची फी कष्टानें दिली त्यांस कनिष्ट इंग्रजी शाळेंत नादार घ्यावें; ज्यांनीं या ठिकाणीं मोठ्या कष्टानें फी दिली, त्यांस मध्यम शिक्षणाच्या शाळेंत नादार घ्यावें, व ज्यांनीं शाळेंतील सर्व शिक्षणाचा खर्च स्वतः मोठ्या कष्टानें सोसला, त्यांस मात्र कॉलेजांत नादार घ्यावें. असे नियम केल्यास जीं अगदीं गरीब मुलें बुद्धीच्या जोरानें स्कॉलरशिपा वगैरे मारून

विद्या करतील, तींच पुढें वरिष्ठ शिक्षण मिळवितील; बाकीचीं जीं गळतील तीं लवकर उद्योगास लागतील." (पृ. २४२). शिकलेल्या लोकांत स्वाभिमान शिल्लक राहण्याच्या दृष्टीनें वरील सूचना फार महत्त्वाच्या आहेत.

कोंकणस्थांनीं यापुढें शिक्षणाच्या फंदांत न पडतां निरनिराळे हस्तव्यवसायांचे धंदे करावे आणि मजुरांप्रमाणें शारीरिक कष्ट व हमाली करण्यास तयार व्हावें, असा उपदेश कित्येक लोक करीत असतात, व कै. माधवराव गोळे यांच्या ग्रंथांतील विचारसरणीस धरून हें मत आहे, असा त्यांच्या बोलण्याचा रोख असतो. परंतु हें प्रतिपादन योग्य नाहीं. ब्राह्मणांनीं सरसहा विद्याव्यासंगांतून परावृत्त व्हावें, असा त्यांच्या प्रतिपादनाचा निष्कर्ष निघत नसून औद्योगिक शिक्षणाकडे व शरीरसंरक्षणाकडेही ब्राह्मणांनीं बौद्धिक शिक्षणाइतकेंच लक्ष दिलें पाहिजे; हें मात्र त्यांना आग्रहानें सांगावयाचें होतें. असो.

## गोळे व थत्ते कुलांतील विद्यार्थ्यांची शेंकडेवारी

| | गोळे | थत्ते |
|---|---|---|
| लहान मुलें | २३ | ३० |
| प्राथमिक विद्यार्थी | २८ | ३७ |
| हायस्कूल विद्यार्थी | ४२ | २५ |
| कॉलेज विद्यार्थी | ७ | ८ |
| | १०० | १०० |

गोळे-कुलांतील विद्यार्थ्यांची थत्ते-कुलांतील विद्यार्थ्यांशीं शेंकडेवारी तुलना केल्यास असें दिसतें कीं, गोळे-कुलांतील विद्यार्थी हायस्कुलाचें

शिक्षण घेत आहेत परंतु त्या मानानें त्यांची संख्या कॉलेजांत दिसत नाहीं. तथापि केवळ एका कुलाशीं तुलना करून अनुमान काढणें योग्य होणार नाहीं. आणखी कांहीं कुलांचे असेच आंकडे जमविण्यांत येतील, तेव्हां त्यांचा उपयोग नियम सांगण्यास होऊं शकेल.

या कुलांतील वयोमान दाखविणारे आंकडे, त्यांची शेंकडेवारी आणि थत्त्यांची शेंकडेवारी येणेंप्रमाणें आहे.

| वय | व्यक्तिसंख्या | शेंकडा प्रमाण गोळे | शेंकडा प्रमाण थत्ते |
|---|---|---|---|
| ०–५ | २४ | १२ | १४·५ |
| ६–१० | २७ | १३·५ | १२·८ |
| ११–१५ | २६ | १३ | ९·१ |
| १६–२० | २२ | ११ | ९ |
| २१–२५ | १४ | ७ | ८·३ |
| २६–३० | १० | ५ | ११·२ |
| ३१–३५ | १९ | ९·५ | ८·१ |
| ३६–४० | ११ | ६ | ५·२ |
| ४१–४५ | ८ | ४ | ४·९ |
| ४६–५० | ११ | ६ | ५·२ |
| ५१–५५ | ७ | ४ | २·९ |
| ५५–६० | ६ | ३ | २·५ |
| ६० च्या वर | १२ | ६ | ६·४ |

दोन पिढ्यांतील अंतर म्हणजे बापलेकांच्या जन्मकाळांतील अंतर हें थत्ते कुलवृत्तान्तांत दिलें होतें. तसेच गोळ्यांच्या बाबतींतील आंकडे असे आहेत–

| | कमींत कमी वर्षें | जास्तींत जास्त वर्षें | सरासरी वर्षें |
|---|---|---|---|
| सामान्य पिढी | २२ | ४७ | ३३ |
| पहिला मुलगा | २२ | ४४ | ३१ |
| दुसरा मुलगा | २७ | ४७ | ३६ |
| तिसरा मुलगा | ३६ | ३८ | ३७ |

थत्त्यांच्या सामान्य पिढीचें मान २९ वर्षें आलें होतें आणि गोळ्यांच्या ३३ वर्षें आलें.

गोळेकुलांतील विद्यमान व्यक्तींचे वैवाहिक संबंध ज्या कुलांशीं आले त्यांचीं नांवें "माहिती" या प्रकरणांत ठिकठिकाणीं दिलीं आहेत. त्यावरून गोळ्यांच्या २३० मुली इतरांच्या घरीं गेल्या आणि २३९ मुली गोळ्यांच्या घरीं आल्या; व ही देवघेव होतांना गोळ्यांचा १०५ उपनांवांशीं संबंध आला त्यांत जोशी, गोखले, पटवर्धन, केळकर, साठे, भिडे, खरे व गोडबोले हीं नांवें पुष्कळ वेळां आढळतात, अर्थात् हीं उपनांवें बहुसंख्य असलीं पाहिजेत.